नागपूर
महासागर
# वृत्तसागर
गुरूवार ■ दि. १० एप्रिल २०२५

## ड्रग्ज विक्रेता पोलिसांच्या जाळ्यात

■ **महासागर प्रतिनिधी, नागपूर, दि. ९:**
नंदनवन पोलिसांनी गस्तीदरम्यान अंमली पदार्थाची विक्री करणाऱ्या एका तरुणाला अटक केली. झडतीमध्ये त्याच्याजवळ 14.33 ग्रॅम मेफेड्रान ड्रग्ज (एमडी) मिळाले. सोनू संजय इरमलवार (25) रा. भुतेश्वरनगर, गंगाबाई घाट असे अटकेतील आरोपीचे नाव आहे.

नंदनवन पोलिसांचे पथक ठाण्यांतर्गत गस्त घालत होते. या दरम्यान एक तरुण वाठोडाच्या जुनी वस्तीजवळील मैदानात अंमली पदार्थाची विक्री करीत असल्याची माहिती पोलिसांना मिळाली. या माहितीच्या आधारावर पोलिसांनी परिसराची घेराबंदी करून त्याच्यावर धाड टाकली. पोलिसांना पाहताच सोनूने दुचाकी वाहनाने पळ काढला. पोलिसांनी पाठलाग करून त्याला पकडले. झडतीमध्ये त्याच्याजवळ 14.33 ग्रॅम एमडी मिळाले. पोलिसांनी त्याच्याजवळून मोबाईल आणि दुचाकी वाहनासह 2.38 लाख रुपयांचा माल जप्त केला.

सोनू हा केवळ माल पोहोचविण्याचे काम करतो. गंगाबाई घाट परिसरातील गुंड धीरज याने त्याला माल विकण्यासाठी दिला होता. आरोपी वाठोडा परिसरात सिमबॉसिस कॉलेजच्या आसपास ड्रग्जची विक्री करतात. धीरज अनेक दिवसांपासून या धंद्यात सक्रीय आहे. मात्र अद्याप तो पोलिसांच्या हाती लागला नाही. पोलिसांनी सोनूविरुद्ध एनडीपीएस ॲक्ट अन्वये गुन्हा नोंदविला आहे.

# फटाक्याच्या गोदामाला भीषण आग







■ **महासागर प्रतिनिधी, नागपूर, दि. ९:**
नागपुरातील उत्तर भागात बुधवारी एका फटाक्याच्या गोदामाला भीषण आग लागली. वैशाली नगर येथील प्रेमनगर उड्डाणपुलाखाली स्थित या गोदामात लग्नसराईच्या हंगामामुळे मोठ्या प्रमाणात फटाके साठवले होते. गोदामात गनपावडर असल्याने आग काही मिनिटांतच संपूर्ण परिसरात पसरली. स्फोटक साहित्यामुळे वारंवार स्फोटांचे आवाज येत होते. आगीची माहिती मिळताच अग्निशमन विभागाच्या नऊ गाड्या घटनास्थळी दाखल झाल्या. आगीवर नियंत्रण मिळवण्यात अग्निशमन दलाला यश आले आहे.

दाट लोकवस्तीत हे गोदाम असल्याने जवळपासच्या घरांना धोका निर्माण झाला होता. मात्र अग्निशमन दलाच्या जवानांनी अथक प्रयत्नांनंतर आग आटोक्यात आणली. या घटनेत लाखो रुपयांचे नुकसान झाल्याचा प्राथमिक अंदाज आहे.

**उन्हाळा सुरू झाल्याने आगीच्या घटनांमध्ये वाढ**

आगीची तीव्रता इतकी होती की धूर आणि ज्वाळा अनेक किलोमीटर अंतरावरून दिसत होत्या. खबरदारीचा उपाय म्हणून पोलिसांनी उड्डाणपुलावरील वाहतूक बंद केली. मात्र मोठ्या संख्येने नागरिक पुलावर जमा होऊन आगीचे व्हिडिओ काढत होते. हा या उन्हाळ्यातील सहावा आगीचा मोठा अपघात आहे. उन्हाळा सुरू झाल्यापासून शहरात आगीच्या घटनांमध्ये वाढ झाली आहे. नागरिकांनी सतर्कता बाळगावी, असे मनपाने म्हटले आहे.

## या वृक्षासाठी शेतकऱ्याला १ कोटींची नुकसान भरपाई

■ **महासागर प्रतिनिधी, नागपूर, दि. ९:**
शंभर वर्षे जुन्या लाल चंदनाच्या वृक्षाची नुकसानभरपाई न मिळाल्यामुळे यवतमाळ जिल्ह्यातील एका शेतकऱ्याने मुंबई उच्च न्यायालयाच्या नागपूर खंडपीठात याचिका दाखल केली आहे.

या वृक्षाची नुकसान भरपाईसाठी रेल्वेने एक कोटी रुपये जमा केले आहेत. वर्धा-यवतमाळ-पुसद-नांदेड रेल्वे प्रकल्पासाठी यवतमाळ जिल्ह्यातील पुसद तालुक्यातील खर्शी गावातील याचिकाकर्त्या शेतक?याची जमीन अधिग्रहित करण्यात आली. या अधिग्रहित जमिनीबाबत काही शेतक?यांना नुकसानभरपाई देण्यात आली. मात्र, लाल चंदनाच्या झाडासह इतर झाडे आणि भूमिगत पाईपलाईन यासाठी केलेल्या दाव्यांना नकार देण्यात आला. त्यामुळे केशव शिंदे आणि त्यांच्या कुटुंबीयांनी नागपूर खंडपीठात याचिका दाखल केली.

**जमिनीचा मोबदला दिला, वृक्षाचा नाकारला**

याचिकेनुसार, रेल्वे प्रकल्पासाठी अधिग्रहित केलेल्या जमिनीबाबत नुकसानभरपाई देण्यात आली. पण ८ फेब्रुवारी २०१८ रोजी पुसद येथील भूसंपादन अधिकारी यांनी लाल चंदनाच्या झाडासह इतर झाडे व भूमिगत पाईपलाईनच्या किमती नुसार नुकसानभरपाई देण्याची मागणी फेटाळून लावली. त्यानंतर याचिकाकर्त्यांनी यवतमाळचे जिल्हाधिकारी यांच्याकडेही अर्ज केला. मात्र, नुकसानभरपाई न मिळाल्यामुळे त्यांनी उच्च न्यायालयात याचिका दाखल केली. ८ फेब्रुवारी २०१८ रोजी पारित झालेला वादग्रस्त पुरस्कार रद्द करण्यात यावा आणि लाल चंदनाचे वृक्ष, इतर झाडे व भूमिगत पाईपलाईनच्या मूल्यांकनानुसार नुकसानभरपाई राज्य सरकार व रेल्वे प्रशासनाने द्यावी, अशी मागणी याचिकेत करण्यात आली.

या प्रकरणाच्या मागील सुनावणीत न्यायालयाच्या आदेशानुसार मध्य रेल्वेच्या नागपूर विभागाने १ कोटी रुपयांची रक्कम न्यायालयात जमा केल्याची माहिती दिली होती. त्यावर न्यायालयाने सांगितले होते की, कोणतीही रक्कम जारी करण्यापूर्वी लाल चंदनाच्या झाडाचे मूल्यांकन अभिलेखात सादर करणे आवश्यक आहे. जर मूल्यांकन कमी असेल तर त्यातून योग्य ती रक्कम याचिकाकर्त्याला दिली जाईल. आणि जर मूल्यांकन जास्त निघाले, तर उर्वरित रक्कम रेल्वे प्रशासनाने भरावी लागेल.

## जलपर्यटन प्रकल्प लवकरच सुरू



■ **महासागर प्रतिनिधी नागपूर, दि. ९:**
वनमंत्री गणेश नाईक यांनी नागपूर येथे माध्यमांशी संवाद साधताना मुनावळे जलपर्यटन प्रकल्पाबाबत महत्त्वाची माहिती दिली.

त्यांनी स्पष्ट केले की हा प्रकल्प थांबवण्यात आलेला नाही. राज्य शासनाने मुनावळे येथे आंतरराष्ट्रीय दर्जाचा जलपर्यटन प्रकल्प विकसित करण्याचे ठरवले आहे. वन आणि पर्यावरण विभागाकडून आवश्यक परवानगी मिळताच प्रकल्पाचे काम सुरू होईल. महायुतीच्या नेत्यांनी जनतेसाठी कोणताही प्रकल्प करण्याचा निर्णय घेतल्यास सर्व नेते त्याच्या पूर्ततेसाठी प्रयत्न करतील, असे नाईक यांनी सांगितले.

वनमंत्र्यांनी विदर्भातील वन क्षेत्राबाबतही महत्त्वाची माहिती दिली. विदर्भात 65 टक्के जंगल असून बहुतांश वन विभागाची कार्यालये नागपुरात आहेत. वाघ-मानव संघर्ष आणि वाघांच्या मृत्यूंबाबत चर्चा करण्यासाठी नागपुरात दोन दिवसीय बैठकांचे आयोजन करण्यात आले आहे.

वन विभागाचे उत्पन्न वाढवण्यासाठी वन विकास महामंडळ, मंग्रोव्ह डिव्हिजन आणि सामाजिक वनीकरणाच्या माध्यमातून प्रयत्न सुरू आहेत. महाराष्ट्राचे वनक्षेत्र 21 टक्क्यांवरून 30 टक्क्यांपर्यंत वाढवण्याचे लक्ष्य ठेवण्यात आले आहे. नाईक यांनी महायुतीबाबत बोलताना सांगितले की प्रत्येक पक्षाला आपला विस्तार करण्याचा अधिकार असल्याचेही वनमंत्र्यांनी स्पष्ट केले.

## खुनाच्या आरोपात आजन्म कारावास

■ **महासागर प्रतिनिधी, नागपूर, दि. ९:**
जुन्या वैमनस्यातून एका तरुणाची हत्या करणाऱ्या तिघांना अतिरिक्त जिल्हा व सत्र न्यायाधीश एच.सी. शेंडे यांनी दोषी ठरवून आजन्म कारावासाची शिक्षा सुनावली आहे. कय्यूम अहमद अब्दुल बशीर (30), जहीर मोहम्मद अब्दुल बशीर (32) आणि सिराज अहमद अब्दुल बशीर (43) सर्व रा. लोधीपुरा, बजेरिया अशी दोषींची नावे आहेत. सीताबर्डी पोलिसांनी त्यांच्याविरुद्ध जावेद अजीद अंसारी (26) रा. जाफरनगरच्या खुनाचा गुन्हा नोंदविला होता.

जावेदसोबत आरोपींचा जुना वाद होता. 12 ऑक्टोबर 2009 च्या रात्री 10.45 वाजताच्या सुमारास जावेद आपल्या मित्राला भेटण्यासाठी रिजंट टॉकीजजवळ गेला होता. या दरम्यान आरोपींनी त्याच्यावर हल्ला केला. तीक्ष्ण शस्त्रांनी वार करून त्याची हत्या केली. पोलिसांनी जावेदचा भाऊ नावेदच्या तक्रारीवरून गुन्हा नोंदविला होता.

दोन दिवसानंतर आरोपींना अटक करण्यात आली. तत्कालीन पोलिस निरीक्षक एस.डी.भोसले आणि सहायक पोलिस निरीक्षक एस.एस.भोगे यांनी प्रकरणाचा तपास करून न्यायालयात आरोपपत्र दाखल केले. सरकारी वकील आसावरी परसोडकर आरोप सिद्ध करण्यात यशस्वी झाल्या. न्यायालयाने तिघांनाही दोषी ठरवून आजन्म सश्रम कारावासाची शिक्षा सुनावली. पैरवी अधिकारी म्हणून पोहवा किरण कैथल आणि मिनल लोणारे यांनी अभियोजन पक्षाला सहकार्य केले.

## नागपूर ग्रामीण भागात सहा नवीन पोलीस ठाणे

■ **महासागर प्रतिनिधी, नागपूर, दि. ९:**
नागपूर ग्रामीण भागातील कायदा सुव्यवस्था अधिक बळकट करण्यासाठी राज्य सरकारने महत्त्वपूर्ण पाऊल उचलले आहे. सहा नवीन पोलीस ठाण्यांची निर्मिती करण्याचा निर्णय घेण्यात आला आहे.

महसूल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी या पोलीस ठाण्यांच्या निर्मिती प्रक्रियेला वेग देण्याचे निर्देश दिले आहेत. मुख्यमंत्र्यांचे सचिव डॉ. श्रीकर परदेशी आणि पोलीस आयुक्त रवींद्र सिंघल यांच्या उपस्थितीत झालेल्या बैठकीत हा निर्णय घेण्यात आला.

वडोदा, बाजारगाव, मोहपा, पाचगाव, नांद आणि कान्होली बारा या सहा ठिकाणी नवीन पोलीस ठाणी उभारली जाणार आहेत. या नव्या पोलीस ठाण्यांमुळे ग्रामीण भागातील सुरक्षा व्यवस्था बळकट होईल. नागरिकांच्या सुरक्षिततेसाठी तात्काळ उपाययोजना करणे शक्य होणार आहे.

महसूल मंत्री बावनकुळे यांनी सांगितले की, ग्रामीण भागात गुन्हेगारीवर प्रभावी नियंत्रण मिळवण्यासाठी आणि नागरिकांना त्वरित मदत मिळण्यासाठी ही पोलीस ठाणी आवश्यक होती. त्यांनी सर्व संबंधित विभागांना या प्रकल्पाला प्राधान्य देण्याच्या सूचना दिल्या आहेत.

### आ. समीर मेघे आणि आ. चरणसिंह ठाकूर यांना उच्च न्यायालयाची नोटीस

## भाजपचे दोन आमदार अडचणीत



■ **महासागर प्रतिनिधी, नागपूर, दि. ९:**
जिल्ह्यातील भाजपच्या दोन आमदारांच्या अडचणी वाढल्या आहेत. हिंगणा विधानसभा मतदारसंघाचे आमदार समीर मेघे आणि काटोल विधानसभा मतदारसंघाचे आमदार चरणसिंह ठाकूर हे अडचणीत सापडले आहेत. मुंबई उच्च न्यायालयाच्या नागपूर खंडपीठाच्या वतीने या दोन्ही आमदारांना नोटीस बजावण्यात आली आहे. तसेच आगामी तीन आठवड्यांच्या आत आपला जबाब नोंदवण्याचे निर्देश देखील खंडपीठाने दिले आहेत.

हिंगणा मतदारसंघातील भारतीय जनता पक्षाचे आमदार समीर मेघे यांच्या विरोधात राष्ट्रवादी कॉंग्रेस शरदचंद्र पवार गटाचे पराभूत उमेदवार रमेशचंद्र बंग यांनी याचिका दाखल केली आहे. तर काटोल विधानसभा मतदारसंघातील भारतीय जनता पक्षाचे विजयी उमेदवार आमदार चरणसिंह ठाकूर यांच्या विरोधात देखील राष्ट्रवादी कॉंग्रेस शरदचंद्र पवार पक्षाचे पराभूत उमेदवार सलील देशमुख यांनी याचिका दाखल केली होती. विधानसभा निवडणुकीत या दोन्ही आमदारांनी नियमांचे उल्लंघन केल्याचा आरोप यामध्ये करण्यात आला आहे. तसेच त्यामुळे या दोन्ही आमदारांची निवड अवैध ठरवण्याची मागणी याचिकेत करण्यात आली आहे.

याच याचिकेनुसार आता समीर मेघे आणि आमदार चरणसिंह ठाकूर यांना नागपूर खंडपीठाने नोटीस पाठवली आहे. त्यामुळे आता या नोटिसीवर हे दोन्ही आमदार नेमके काय उत्तर सादर करतात? त्यावर नागपूर खंडपीठ काय निर्णय घेते? हे पाहणे महत्त्वाचे ठरणार आहे.

माजी गृहमंत्री आणि शरद पवार गटाचे नेते अनिल देशमुख यांनी विधानसभा निवडणुकीतून माघार घेतली होती. त्यांनी आपला मुलगा सलील याला निवडणुकीच्या रिंगणात उतरवले होते. अनिल देशमुख यांनी पहिल्या यादीतच काटोलमधून उमेदवारी जाहीर केली होती. मात्र, अनिल देशमुख यांनीच सलीलच निवडणूक लढणार असल्याचे सांगितले होते. अनिल देशमुख यांनी माध्यमांशी संवाद साधला होता. त्यावेळी त्यांनी निवडणूक न लढण्याचे कारण सांगत भाजपवरही जोरदार हल्लाबोल केला होता. मी निवडणूक लढत नसलो तरी राज्यात महाविकास आघाडीचे सरकार आल्यावर मी मंत्री होणार, असा विश्वासही त्यांनी व्यक्त केला होता.

## मालवाहू चालकाचा हैदोस

### रस्त्याने जाणाऱ्या तिघांना उडविले

■ **महासागर प्रतिनिधी नागपूर, दि. ९:**
बुधवारी सायंकाळी कळमनाच्या चिखली चौकात एका बोलेरो मालवाहूच्या चालकाने हैदोस घातला. निष्काळजीपणे व भरधाव वाहन चालवत पती-पत्नीसह तिघांना धडक देत गंभीर जखमी केले.

या घटनेने परिसरात एकच खळबळ उडाली. जवळच कर्तव्यावर तैनात वाहतूक पोलिसांनी आरोपी चालकाला पकडले. जखमींमध्ये रामेश्वरी दांदरे (35), तिचा पती जतन दांदरे (40) आणि बादल मेश्राम (25) यांचा समावेश आहे. हेमरतन वर्मा (रा. विजयनगर, कळमणा) असे आरोपी चालकाचे नाव आहे.

पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, बुधवारी सायंकाळी 7 वाजताच्या सुमारास रामेश्वरी दांदरे आपल्या पतीसोबत सायकलवरून घरी जात होती. त्याच वेळी चिखली चौकाकडे भरधाव वेगात येणाऱ्या बोलेरो मालवाह चा चालक वर्मा याने त्यांना जबर धडक दिली. त्यानंतर जवळच असलेल्या बादल मेश्राम यालाही उडविले. या धडकेमुळे तिघेही गंभीर जखमी झाले. या घटनेने परिसरात खळबळ उडाली. जवळच कर्तव्यावर तैनात वाहतूक पोलिसांनी घटनास्थळी धाव घेतली. आरोपी चालक वर्मा याला पकडून पोलिसांना सूचना दिली. घटनेची माहिती मिळताच कळमना पोलिस घटनास्थळी पोहोचले. जखमींना उपचारार्थ रुग्णालयात रवाना करून आरोपी चालकाला ताब्यात घेतले.

**ब्रेक फेल झाल्याने घडली घटना**

चौकशीत आरोपी चालक वर्मा याने वाहनाचे ब्रेक फेल झाल्याने ही घटना घडल्याचे सांगितले. पोलिसांनी याबाबत प्रादेशिक परिवहन कार्यालयाला (आरटीओ) माहिती दिली आहे.

आरटीओ त्याच्या वाहनाचे ब्रेक फेल होते किंवा नाही याचा तपास करणार आहे. कलमणा पोलिसांनी आरोपी चालकाविरुद्ध गुन्हा दाखल करून अटक केली आहे. पुढील तपास सुरू आहे. सुदैवाने या अपघातात कोणतीही जीवितहानी झाली नाही. जखमींवर रुग्णालयात उपचार सुरू आहेत.







■ ***नागपूर :*** *गेल्याच आठवड्यात अवकाळी पावसाने नागपूर शहर आणि जिल्ह्याच्या काही भागाला दणका दिल्यानंतर आज बुधवारी पुन्हा सायंकाळी पावसाने वादळी वाऱ्यासह शहराला तडाखा दिला. वादळाने झोपडपट्टी सदृष्य भागातील अनेक घरांवरचे छप्पर उडाले तर बाजारपेठेतही तारांबळ उडाली. दुपारनंतर अनेक पादचाऱ्यांना पावसापासून बचाव करताना रस्त्याच्या कडेला आश्रय घ्यावा लागला.*

# रेल्वे क्रॉसिंग अंडरपास सातनवरी रस्त्याचे बेहाल



**ओव्हरलोड टिप्पर, डोजरच्या वाहतुकीने अक्षरशः रस्त्याची चाळण**

■ **महासागर प्रतिनिधी,**
**कुही , दि. ९ :** बस स्थानक, ग्राम विकास विद्यालय ते आजनी इसापूर - नवेगाव - सातनवरी रोडवरील रेल्वे क्रॉसिंग अंडरपास पर्यंत एक किलोमीटर चा रस्ता खड्डेमय झालेला आहे. ब्रॉडगेज रेल्वे बांधकामामुळे ओव्हरलोड टिप्पर, डोजरच्या वाहतुकीने अक्षरश: रस्त्याची चाळण झालेली दिसून येते. मोठमोठे खड्डे व त्यात अवकाळी पावसाचे पाणी जमा राहुन, नागरिकांना प्रवास करणे म्हणजे अगदी तारेवरची कसरत झालेली आहे. मागील पाच वर्षापासून इतवारी रेल्वे स्टेशन ते नागभीड ब्रॉडगेजचे काम संथगतीने सुरू आहे. काही महिन्यांपूर्वी माहुली ते मोहदरा टप्प्याचे काम सुरू झाले. कुही शहरापासून एक किलोमीटर अंतरावर आजनी इसापूर रस्त्या दरम्यान अंडरपास पूर्ण होऊन, रेल्वे लाईनचे संथगतीने काम सुरू आहे. भरणासाठी लागणारे माती, मुरूम, गिट्टी व बोल्डर साहित्याचे ओव्हरलोड टिप्पर व डोजर च्या वाहतुकीमुळे सदर्हू डांबरी रस्ता जागोजागी फुटलेला आहे. जागोजागी भले मोठे मोठे खड्डे पडलेले दिसून येतात. अवकाळी पावसात ह्या खड्ड्यात पाणी जमा झाल्याने, नेमका पाण्याचा अंदाज लक्षात न आल्यामुळे अपघाताचे प्रमाण वाढलेले आहेत. काहीजण जखमी झाल्याच्या घटना घडल्या आहेत. या रस्त्याने प्रवास करणे म्हणजे मोठी समस्या निर्माण झालेली आहे. शालेय, महाविद्यालयीन विद्यार्थ्यांना दुचाकी व सायकलने प्रवास करताना भरपूर त्रास सहन करावा लागतो.

मागील आठवड्यातील अतिवृष्टी दरम्यान सदर रस्त्याला तलावाचे स्वरूप आलेले होते. सदर कुही ते आजनी इसापूर हा रस्ता सार्वजनिक बांधकाम विभागाच्या अखत्यारित्त येतो. नागरिकांनी वारंवार संपर्क करूनही या विभागाने अक्षरश: दुर्लक्ष केलेले आहे. सदर रस्त्याचे मजबुतीकरण व डांबरीकरण होण्यासंदर्भात नागरिकांची मागणी जोर धरत आहे.

# हनुमान मंदीरात रौप्यमहोत्सव निमीत्य विविध कार्यक्रम

■ **महासागर प्रतिनिधी,**
**वाडी, दि. ९ :** दत्तवाडीतील मंगलधाम सोसायटी मधील रामकृष्णनगर हनुमान मंदीरात रौप्य महोत्सव वर्ष निमीत्य विविध कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले. या निमित्याने मंदिरात मंगळवार एप्रिल रोजी सकाळी महाअभिषेक , होमहवन करण्यात आले.सायंकाळी ७वाजता महाआरती व संगीतमय सुंदरकांडचे आयोजन करण्यात आले. महाप्रसादाने कार्यक्रमाची सांगता करण्यात आली.



कार्यक्रमाच्या आयोजनासाठी नरेंद्र नानोटकर , अशोक तिवारी ,नेमदास म्हसकी, जेम्स फ्रान्सीस , नितीन अनपूर्णे , योगेश राऊत , संजू कोसे , सुधाकर वासुरकर , पंकज सिंग , भाजीखाये , निलेश उघडे , विक्रम तिजारे , सुबोध शर्मा , राजू पोहनकर , रोशन काकडे , विजय गौतम , रमेश धोटे , दीपक काकडे ,अरुण धोटे ,विनायक अतकरी, बबलू सिंग , प्रकाश कोसे , संजय अराडे , योगेश मेश्राम , निलेश पारधी , पंकज सोनवणे , निलेश सतदेवे , सुनील रोखडे , निर्मय नानोटकर , दक्ष राऊत , धीरज पिल्ले , प्रशांत म्हसकी , सुशील अहिरवार , सुरेश अग्रवाल , सचिन चौबे ,प्रतिभा नानोटकर , प्रिया अनपूर्णे , स्नेहा म्हसकी ,ममता राऊत , अर्चना कोसे , प्रतिभा पारधी , माधुरी नाकाडे , शीला भोयर ,संगीता फ्रान्सीस , अंजु तिवारी , जोती वासुरकर , शिला अहिरवार ,भंगाडे ,रंजिता काकडे,मोहड ,रामटेके , धकाते ,शीतल पिल्ले , सुषमा गोर , छाया तिजारे , जया पोहनकर , मनोरमा श्याक्य , भगत , ढोक , धकाते ,रजनी धोटे आदींनी सहकार्य केले.

# काटोल विधानसभेतील शेतकरी जिल्हाधिकारी कार्यालयावर



■ **महासागर प्रतिनिधी,**
**काटोल, दि. ९ :** काटोल मतदारसंघातील शेतकऱ्यांनी सोमवार ७ फरवरी रोजी नागपूर येथे जिल्हाधिकारी यांची भेट घेतली असता शेतकऱ्यांच्या पिक विमा संदर्भात संबंधित विभागातील कामचुकार अधिकाऱ्यांच्या तक्रारी करण्यात आल्या काही दिवसांपूर्वी नरखेड येथे जिल्हा कृषी अधिकाऱ्यातर्फे पिक विमा तक्रारीबाबत समाधान शिबिर आयोजन केले या शिबिरामध्ये संबंधित शासकीय कृषी अधिकारी विमा प्रतिनिधी आणि शेतकरी उपस्थित होते. या सभेमध्ये गोंधळाची स्थिती निर्माण झाली होती.

त्याचे कारण शासकीय प्रतिनिधी व विमा प्रतिनिधीकडून शेतकऱ्यांचे पिक विमा तक्रारीचे योग्य तऱ्हेने निवारण करण्यात आले नसल्याने त्यामुळे शेतकऱ्यांनी संताप व्यक्त केला. शेतकऱ्यांनी नरखेड तहसीलदाराकडे धाव घेतली असता त्यावेळेला शेतकऱ्यांनी एकच मागणी केली. जिल्हाधिकारी जे तक्रार निवारण समितीचे अध्यक्ष आहेत त्यांच्याशी शेतकऱ्यांच्या शिष्टमंडण्याची भेट घालून द्यावी. पिक विमा संदर्भात असलेल्या अडचणी सोडण्यात याव्या असे मागणी शेतकऱ्यांनी जिल्हाधिकारी यांच्याकडे केली आहे. पिक विमा संबंधित अधिकाऱ्यांशी लवकरच बैठक घेणार असल्याची माहिती जिल्हाधिकारी यांनी दिली आहे

# वानाडोंगरी नगरपरिषद तर्फे महिलांना कापडी पिशव्या बनविण्याचे धडे

■ **महासागर प्रतिनिधी,**
**हिंगणा, दि. २ :** नगर परिषद वानाडोंगरी , फीडबॅक फॉउंडेशन व गोदरेज तर्फे शिबीरात परिसरातील५०० महिलांना टाकाऊ वस्तूपासून टिकाऊ वस्तू तयार करण्याचे प्रशिक्षण देण्यात आले. विविध लक्ष केंद्रित समूहाला टाकावू वस्तूपासून टिकाऊ वस्तू , कापडी पिशवी बनविने,फुलांपासून धूप बनविणे, हँडवॉश बनविणे, पायदान, गृहउपयोगी सुशोभी करण्याच्या वस्तू बनविणे, जुन्या कपड्या पासून दोरी बनविणे,पेपर बॅग इ.वस्तूचे प्रशिक्षण विविध लक्ष केंद्रित गटांना देण्यात आले.माझी वसुंधरा अभियान स्वच्छ सर्वेक्षण 0 अंतर्गत पर्यावरणास हानी पोहचवणाऱ्या कचऱ्याची निर्मिती कमी करण्यासाठी प्लास्टिकचा उपयोग न करता कापडी पिशव्या चा वापर करणे. घरगुती स्तरावर टाकाऊ वस्तू पासून टिकाऊ वस्तू बनविणे, ओल्या कचऱ्या पासून खत बनविणे, या उद्देशाने महिलामध्ये मोठया प्रमाणात जनजागृती करण्यासाठी टाकाऊ वस्तूपासून टिकाऊ वस्तू बनविने कार्यशाळा आयोजित करण्यात आली होती. कार्यशाळेत तज्ञांकडून हे प्रशिक्षण देण्यात आले. अनेक प्रकारच्या कापडी बॅग तयार करणे , धूप बनविणे, पायदान, पेपर बॅग बनविणे. या प्रशिक्षणचा मुख्य उद्देश कमीत कमी कचरा निर्माण करणे आदी प्रशिक्षण देण्यात आले. वानाडोंगरी नगरपरिषद चे मुख्याधिकारी राहुल परिहारयांच्या मार्गदर्शनात स्वच्छता व पाणी पुरवठा विभाग प्रमुख निलेश नंदनवार , स्वच्छता निरीक्षक विनय व्यास ,करण चव्हाण , आचल चव्हाण , फीडबैक फाउंडेशन च्या सविता गजभिये ,उज्वला,दक्षता,अंजली , रवि,आदित्य, नेहा पायल प्रणाली, शीतल, शिल्पा परिश्रम घेतले .



## दोन दुचाकीच्या धडकेत एकाचा घटनास्थळी मृत्यू

**रामटेक-मौदामार्गांवरील टी -पॉईंटपरिसरातील घटना**



**रामटेक :** रामटेक पोलीस स्टेशन अंतर्गत येणाऱ्या रामटेक मौदा टी-पॉईंट परिसरात दोन दुचाकीच्या आमोरासमोर झालेल्या धडकेत एका वर्षीय व्यक्तीचा मृत्यू झाल्याची घटना दि. ८ एप्रिल रोजी रात्री११.३० . वाजताच्या सुमारास घडली असून मृत व्यक्तीचे नाव दिपक मेहरकुळे रा. दुधाळा (हल्ली मुक्काम परसोडा) असे आहे. प्राप्त माहितीनुसार, मृतक दिपक मेहरकुळे यांची मौदा टी पॉईंट येथे पानठेला आहे.रात्री ११.३०. वाजताच्या सुमारास पानठेला बंद करून आपल्या वाहन क्रमांक एम एच ४० ए बी ७६६५ हिने घरी जात असतांना टी - पॉईंट मौदा मार्गावरील सुरकार ट्रेडर्स समोर विरुद्ध दिशेने येणाऱ्या दुचाकी क्रमांक एम एच ४० टी ०२४ हर्षल कावळे आणि दिपक यांच्या दुचाकीला आमोरासमोर जोरदार धडक झाली. यात दीपकच्या डोक्याला गंभीर इजा झाली. यातच त्यांचा घटनास्थळी मृत्यू झाला. तर हर्षल शिवशंकर कावळे रा. नगरधन हा किरकोळ जखमी झाला. मात्र घटनास्थळावरील व्हीडिओ पहिले असता घटनास्थळी ३ व्यक्ती जखमी झालेल्या अवस्तेत रस्त्यावर पडल्याचे दिसत आहेत. मात्र २जखमीची कुठलीही माहिती समोर आलेली नाही. रामटेक पोलीस घटनेचा अधिक तपास करीत असून परिसरातील सी सी टी व्ही हाताळत आहेत. घटनेचे सत्य लवकरच पोलीस तपासात समोर येईल.

## शोभायात्रेचे ठिकठिकाणी स्वागत करण्यात आले



**काटोल:** काटोल येथे रामनवमी निमित्य भव्य शोभयात्रेचे आयोजन करण्यात आले होते. तसेच शोभायात्रेचे ठिकठिकाणी जोरदार स्वागत करण्यात आले. पोलीस स्टेशन समोर मुख्य रस्त्यावर सर्व रामभक्ताकरिता महाप्रसादाचे आयोजन करण्यात आले. तसेच पुष्पवृष्टी करून फटाक्याची आतिषबाजी करण्यात आली. याकरिता रामभक्त तसेच भाजपा विधी आघाडीचे नागपूर ग्रामीण चे महामंत्री ऍड. सुजित लाडसे, संदीप भस्मे,देवेंद्र धोटे, अभिषेक जैस्वाल, निटू जैस्वाल, अश्विन जैस्वाल, राजेश बननगरे, रोहन डंभाळे, बद्रू भाई, संजय बरघट, चेतन राजुरकर, सतीश मेंढे, जितू केळकर,संदीप,अजय ढोके,अंकित केला यांनी आयोजन केले.

# अनुकंपावर आधारीत आकाश सिडामला मिळाली नियुक्ती आदेश




■ **महासागर प्रतिनिधी,**
**वाडी, दि. ९ :** आकाश मुनिम सिडाम, बी. एससी.याला वडील मुनिम सिडाम यांचे २४ ऑगष्ट २०१७ ला निधनानंतर अनुकंपा तत्त्वावर, नवभारत कन्या विद्यालय येथिल रिक्त प्रयोग शाळा सहाय्यक पदावर,शासन निर्णय व उच्च न्यायालय यांचे निर्देशाप्रमाणे नियुक्ती देण्यासाठी बुधवार २६ मार्च २०२५ सकाळी १० पासून नवभारत कन्या विद्यालय मुल समोर पत्नी हर्षकला सिडाम यांनी उपोषण सुरू केले होते. ७ एप्रिल २०२५ ला संस्था अध्यक्ष एड.अनिल वैरागडे यांनी शिपाई पदावर नियुक्ती देण्यात आली. ८ एप्रिल पासून शिपाई पदावर रुजू झाले आहे. हर्षकला सिडाम यांनी अनुकंपा तत्त्वावर नियुक्तीबाबत विनंती अर्ज १२ एप्रिल२०२३,२१ , एप्रिल २०२३,१०, जुलै २०२३ व २० मार्च २०२५ दिले यावर शिक्षणाधिकारी माध्यमिक जिल्हा परिषद चंद्रपुर २७जुन २०२३,६ , जुलै २०२३, २५ मार्च २०२५ अनुकंपा नियुक्तीसाठी निर्देश दिले होते, मा उच्च न्यायालय याचिका क्रमांक.५१२६/२०२३,निर्णय २२ ऑक्टोंबर २०२४ अन्वये,उतारा क्रमांक नुसार आकाश मुनिम सिडाम यांचे अनुकंपा नियुक्तीस याचिका करते यांनी कोणत्याच आक्षेप नाही असे स्पष्ट केले आहे परंतु संस्थेची धारना पक्की होत नव्हती शिक्षणाधिकारी राजेश पातळे यांनी संस्था अध्यक्ष एड.अनिल वैरागडे यांचेसोबत दुरध्वनीवर चर्चा केली.आमदार सुधिर मनगट्टीवार,आमदार संदीप जोशी यांनीही आकाश सिडात अनुकंपा नियुक्ती करण्यात यावी असे स्पष्ट केले होते.

हर्षकला सिडाम यांनी मुलगा आकाश मुनिम सिडाम याला विज्ञान सहाय्यक पदावर अनुकंपा नियुक्ती देण्याची मागणी केली होती परंतु शिपाई पदावर नियुक्ती देण्यात आली त्यामुळे बुधवार २६ मार्च २०२५ सकाळी १० वाजता पासून नवभारत कन्या विद्यालय मुल समोर बेमुदत उपोषण सोमवार ७ एप्रिल रोजी स्थगित करण्यात आले.

यावेळी खाजगी शाळा शिक्षक संघाचे अध्यक्ष प्रमोद रेवतकर, विजय खोब्रागडे,किरण खोब्रागडे, धनराज मुनघाटे, आशुतोष गाजेवार, श्रीमती जयश्री करकाडे, प्रविण सिडाम यांनी आभार व्यक्त केले आहे.

# सोहेल हत्याकांडातील चवथा आरोपीही गजाआड

■ **महासागर प्रतिनिधी,**
**नागपूर, दि. ९ :** गुन्हे शाखा युनिट २ च्या पथकाने गोधनी बाजार परिसरात घडलेल्या सोहेल खान हत्याकांडात फरार असलेल्या चवथ्या आरोपीला गोपनिय माहितीच्या आधारावर म्हाळगीनगर चौकातून अटक केली. अंकित उमाशंकर उसरबरसे (२७) रा. मिलननगर, खरबी असे अटकेतील आरोपीचे नाव आहे. या हत्याकांडातील तीन आरोपींना पोलिसांनी आधीच अटक केली होती. भूषण उर्फ बाल्या जयकुमार बहाड (३५) रा. भांडे प्लॉट, गजेंद्र रामचंद्र मरकाम (३४) रा. गोपळकृष्ण लॉनजवळ वाठोडा आणि धीरज धर्मराज घोडमारे (३९) रा. धोटे कॉलेजमागे, नरसाळा रोड अशी त्यांची नावे असून सध्या ते तुरुंगात आहेत. मानकापूर ठाण्यांतर्गत गोधनी परिसरात राज टॉवर पुढे मंगळवारी साप्ताहिक बाजार भरतो. येथे दुकान लावण्यावरुन सोहेल खान याचा नंदू जयस्वाल व त्याच्या दुकानात काम करणारा आरोपी भूषण उर्फ बाल्या जयकुमार बहाड यांच्यासोबत वाद झाला. ३ एप्रिलच्या रात्री १०.१५ वाजताच्या सुमारास भूषण, गजेंद्र, धीरज, अंकित व इतरांनी सोहेल-वर हल्ला केला. आरोपींनी आधी



सोहेल खान याच्यावर पिस्तूलातून गोळ्या झाडल्या. त्यानंतर चाकूने सपासप वार करत रक्ताच्या थारोळ्यात लोळवले. यात सोहेलचा मृत्यू झाला. या निर्घृण हत्याकांडाचा व्हीडिओ सोशल मीडियावर प्रचंड व्हायरल झाला. हा व्हीडिओ पाहणाऱ्याच्या अंगावर काटे उभे झाले. मानकापूर पोलिसांनी खुनाचा गुन्हा नोंदवून भूषण, गजेंद्र आणि धीरज यांना अटक केली. इतर आरोपी फरार होते. मंगळवारी रात्री गुन्हे शाखा युनिट २ चे पथक हुडकेश्वर पोलिस ठाण्यांतर्गत गस्त घालत होते. या दरम्यान सोहेल हत्याकांडातील एक आरोपी म्हाळगीनगर चौकात कोणाला तरी भेटायला येत असल्याची माहिती पथकाला मिळाली. या माहितीच्या आधारावर पोलिसांनी सापळा रचून अंकितला अटक केली. पुढील कार्यवाहीसाठी त्याला मानकापूर पोलिसांच्या स्वाधिन केले.

## शिवसेना पक्षप्रमुख उद्धव ठाकरे यांनी नागपूर जिल्ह्यातील नियुक्त्या जाहीर केल्या



**कन्हान :** शिवसेना पक्षप्रमुख उद्धव ठाकरे यांनी नागपूर जिल्ह्यातील नियुक्त्या जाहीर केल्या असून नागपूर जिल्हा अध्यक्षपदी सुत्तम मस्के यांची तर पारशिवनी तालुका अध्यक्षपदी श्री गणेश मस्के यांची नियुक्ती करण्यात आली. जिल्हाध्यक्षपदी निवड झालेले सुत्तम मस्के यांच्याकडे उमरेड रामटेक व कामठी विधानसभा क्षेत्राची जबाबदारी देण्यात आली आहे. पक्षप्रमुख

श्री उद्धवजी ठाकरे यांच्या मुंबई येथील निवासस्थानी गणेश मस्के, महाराष्ट्र राज्य संघटक श्री सागर डबरासे,पक्षनेते श्री विनायक राऊत, सामाजिक कार्यकर्ते सचिन कापसे यांनी भेट घेतली. नागपूर जिल्ह्यात शिवसेना ( ऊबाठा) अधिक बळकट करण्याविषयी पक्षप्रमुख श्री उद्धव ठाकरे यांनी मार्गदर्शन केले.

या दोघांच्या नियुक्तीमुळे शिवसेना (उबाठा) कार्यकर्त्यांमध्ये उत्साहाचे वातावरण निर्माण झाले.

# फिलिप मॉरिस इंटरनॅशनलने धूरमुक्तीच्या दिशेने प्रगतीचा तपशील देणारा नवीन एकात्मिक अहवाल प्रसिद्ध केला

**नागपूर, ९ एप्रिल :** फिलिप मॉरिस इंटरनॅशनल इंक. ने आपला सहावा वार्षिक इंटिग्रेटेड रिपोर्ट जारी केला आहे, जो कंपनीच्या व्यावसायिक परिवर्तनाचे आणि शाश्वतता डिस्क्लोझर्सचे १० वे वर्ष सूचित करतो. या दस्तऐवजात सिगारेटचे चलन लवकरात लवकर कमी करण्यासाठी आपल्या धूम्रपान-मुक्त पर्यायांचा अंगिकार वाढवण्याचा उद्देश पुढे नेत असतानाच आपल्या भागधारकांना आणि इतर हितधारकांना दीर्घकालीन मूल्य प्रदान करण्याच्या फिलिप मॉरिस इंटरनॅशनलच्या निरंतर प्रगतीचे तपशील दिले आहेत. फिलिप मॉरिस इंटरनॅशनलचे चीफ एक्झिक्युटिव्ह ऑफिसर यासिक ओल्ज़ाक म्हणाले, आमचा २०२४ इंटिग्रेटेड रिपोर्ट एक लक्षणीय वर्ष साजरे करतो, कारण या वर्षी IQOS, VEEV आणि ZYN च्या व्यावसायिकरणाला दहा वर्षे पूर्ण होत आहेत आणि आधुनिक इतिहासातील एक अत्यंत महत्त्वाकांक्षी व्यावसायिक परिवर्तन साध्य करण्याचा आमचा प्रवास या रिपोर्टमध्ये दर्शविला आहे. धूम्रपान-मुक्त उत्पादनांची सहजप्राप्यता विस्तारित करण्याच्या आमच्या प्रयत्नामुळे, २०२४ च्या अखेरपर्यंत आम्ही अंदाजे ३८.६ मिलियन प्रौढ यूझर्सपर्यंत पोहोचू शकलो आहोत आणि ही उत्पादने ९५ बाजारपेठांमध्ये उपलब्ध आहेत. यावरून शाश्वतता आणि व्यवसाय परिवर्तनाबाबतची आमची दृढ वचनबद्धता दिसून येते. या सिद्धींमुळे माझे मन आशावादाने भरून जाते कारण, आम्ही आमची उत्पादने आणि त्यांच्या ऑपरेशनल प्रभावाला संबोधित करत दीर्घकालीन मूल्यनिर्मिती करणे चालू ठेवत आहोत आणि आमची गती केवळ कायम राखत नाही, तर त्यात वाढ करत आहोत, अशी अनेक लक्ष्ये साध्य करत आहोत, जी काही वर्षांपूर्वी फारच महत्त्वाकांक्षी वाटत होती.

या इंटिग्रेटेड रिपोर्टमध्ये कंपनीचे धोरण, बिझनेस मॉडेल आणि उत्पादन-आधारित (कंपनी काय निर्माण करते) तसेच संचालन-आधारित (कंपनी कसे काम करते) कामगिरीबद्दल माहिती दिली आहे. या रिपोर्टमध्ये व्यापक पाच-स्तंभी फ्रेमवर्कच्या संदर्भात कंपनीची कामगिरी आणि शाश्वतते विषयक दृष्टिकोन समजावला आहे. हे पाच स्तंभ आहेत- अनुपालन, जोखीम कमी करणे, कार्यकारी क्षमता, इनोव्हेशन आणि हेतूपूर्ण परिणाम. या रिपोर्टमध्ये हे भारपूर्वक सांगितले आहे की, नियामक अनुपालन कसे पायाचे काम करते आणि जोखीम व्यवस्थापन व्यवसायाची लवचिकता सुनिश्चित करते. हा दृष्टिकोन प्रक्रिया सुरळीत करून उत्पादकता आणि फायदाकारकता कशी वाढवतो, दीर्घकालीन व्यावसायिक ध्येयांशी शाश्वततेची सांगड घालून इनोव्हेशन व स्पर्धात्मक मूल्याला कशी चालना देतो आणि अखेरीस मानकांवर प्रभाव टाकून, धोरणांना आकार देऊन आणि मार्केटच्या अपेक्षेनुसार पद्धतशीर बदलास चालना देऊन या उद्योगात लक्षणीय परिवर्तन घडवून आणण्याचे उद्दिष्ट कसे ठेवतो यावर हा रिपोर्ट प्रकाश टाकतो.

फिलिप मॉरिस इंटरनॅशनलचे चीफ फायनॅन्ष्यल ऑफिसर इमैनुएल बाबयु म्हणाले, परिवर्तनाचा मार्ग क्वचितच सारळसोट असतो आणि २०२४ मधील आमच्या अनुभवाने एक मोठे सत्य अधिक ठळक केले आहे: धूम्रपान-मुक्त भविष्य साध्य करण्यासाठी संघटित प्रयत्नांची आवश्यकता आहे, जे आमच्या प्रत्यक्ष नियंत्रणाच्या पलीकडे आहे. २०२४ या संपूर्ण वर्षात आमच्या धूम्रपान-मुक्त व्यवसायाचा वाटा च्या एकंदर निव्वळ उत्पन्नात अंदाजे ३९% आहे आणि टॉप आणि बॉटम-लाइन वृद्धीला वेग मिळाला आहे. सिगारेट मार्केटमध्ये स्पर्धा करणे आणि त्याच वेळी त्यात बदल करणे हा विरोधाभास नाही, तर आमच्या प्रवासातील तो एक आवश्यक टप्पा आहे. आर्थिक यशाची सकारात्मक प्रभावाशी सांगड घालण्याचा आमचा इंटिग्रेटेड दृष्टिकोन आम्हाला भविष्यात गुंतवणूक करणे चालू ठेवण्याच्या स्थितीत ठेवतो. आम्हाला खात्री वाटते की, आमची आर्थिक ताकद आणि त्याला असलेली शाश्वतता नेतृत्वाची जोड हाच आम्हाला पुढे नेणारा मार्ग आहे.

# भाजपच्या संघटनात्मक सदस्य नोंदणी अभियानाला उत्तम प्रतिसाद



**वाडी :** भाजपाच्या संघटनात्मक सदस्यता नोंदणी अभियानांतर्गत जानेवारी ते एप्रिल महीन्यात प्राथमिक ऑनलाइन सदस्यता अभियान राबवून राज्यात दीड कोटी तर नागपूर जिल्ह्यात पाच लाख प्राथमिक सक्रिय सदस्य बनविण्याचे लक्ष पूर्ण केले आहे.रविवार एप्रिल रोजी भाजपाचा वा स्थापना दिवस समारोह संपन्न करून ते एप्रिलपर्यंत मंडळाच्या अध्यक्ष पदाकरिता निवड प्रक्रिया पूर्ण करण्याकरिता एप्रीलला गोधनी रेल्वे येथील फोरब्रदर्स हॉटेलात सकाळी वाजता बैठक घेण्यात आली अभियान प्रमुख जिल्हा महामंत्री संध्याताई गोतमारे,निवडणूक निरीक्षक जिल्हा महामंत्री आदर्श पटले,हिंगना विधानसभा समन्वयक नरेश चरडे, अर्जुनसिंह ठाकुर, गोधनी मंडळ निवडणूक प्रमुख आनंदबाबू कदम,सहप्रमुख राकेश मिश्रा,जिल्हा मंत्री सुजीत नितनवरे, मधू बर्वे,विजय राऊत,प्रमोद गमे,दिपक राऊत, प्रकाश डवरे,प्रमोद राऊत, संजय मेहर,कमलेश सिंह ठाकुर,नितीन अडसड, संजय कपनीचोर, ईशांत राऊत,श्रेयस काळे, सरपंच शिवराज ठाकरे,राजेंन्द्र ढेपे,प्रशांत श्रीवास्तव,रत्नाकर ठाकरे, दिनेश डिवरे, शुद्धोधन कोलते, विनायक खवले, ज्ञानेश्वर ढोक,मंगेश सावरकर,सुधाकर ठाकरे, सुधाकर राऊत, विनोद चाफेकर, मोरेश्वर वरठी,मनोज उचके, विनोद हेटे, सुभाष तायडे,अमोल आंबटकर,सुखदेव भोंडे, छत्रपति शेंदरे,आकाश पवार,सुनील दुबे,रोशन बडवाईक,विजय बर्वे, सुशील बावने,अनील पाटील,राजेन्द्र धारगावे,मनोज तिवारी, गणेश जाधव, प्रकाश आझादे आदीसह पदाधिकारी व कार्यकर्ता उपस्थित होते.

RNINo-20789/71 महासागर नागपूर मालक,मुद्रक,प्रकाशक श्रीकृष्ण तनसुखदास चांडक यांनी अरुणोदय प्रेस,कॉटन मार्केट,नागपूर१८ येथे छापून दैनिक महासागर कार्यालय,टेकडी रोड,सिताबर्डी,नागपूर येथे प्रकाशित केले. संपादकश्रीकृष्ण तनसुखदास चांडक
मुख्य कार्यालय फोन७४४७७३५८५१/९१२२९७००२३/७४४७७३५८५३

# उष्माघाताचा धोका वाढतोय नागपुरकरांनो आरोग्य सांभाळा

■ महासागर प्रतिनिधी
नागपूर,दि. ०९ एप्रिल :
मागील काही दिवसांपासून सतत तापमान वाढत आहे. नागपूर शहरातील तापमान ४० अंशाच्या पुढे गेले आहे. पुढेही तापमानात वाढ होण्याची शक्यता आहे. त्यामुळे उष्माघाताचा धोका वाढला आहे. उदभवणाऱ्या आरोग्याच्या समस्या टाळण्यासाठी खबरदारी घेऊन आरोग्य जपावे, असे आवाहन नागपूर महानगरपालिकेचे वैद्यकीय आरोग्य अधिकारी डॉ. दीपक सेलोकर यांनी नागपुरकरांना केले आहे.

वाढत्या तापमानामुळे संभावणारा उष्माघाताचा धोका लक्षात घेता मनपाची आरोग्य यंत्रणा सज्ज झालेली आहे. यासंदर्भात अतिरिक्त आयुक्त श्रीमती वसुमना पंत यांनी मनपाचे इंदोरा नागरी प्राथमिक आरोग्य केंद्र आणि इंदिरा नगर झोपडपट्टी जरीपटका येथील आयुष्मान आरोग्य मंदिर नागरी आरोग्य वर्धिनी केंद्रांना भेट देऊन पाहणी केली.

नागपूर शहरात उष्माघात प्रतिबंधात्मक उपाययोजनांची प्रभावीपणे अंमलबजावणी करण्यात आली आहे. मनपाचे रुग्णालय तसेच शहरातील शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व रुग्णालय (मेडिकल) आणि इंदिरा गांधी शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व रुग्णालय (मेयो) येथे कोल्ड वार्ड तयार करण्यात आलेले आहेत. यासोबतच मुबलक प्रमाणात औषधांचा साठा देखील उपलब्ध करण्यात आलेला आहे. शहरातील संभाव्य उष्माघात प्रभावित ठिकाणे तसेच अन्य भागातही प्याऊची व्यवस्था करण्यात आलेली आहे. तसेच शहरातील सर्व उदयाने सुदधा दुपारच्या वेळी सुरु ठेवण्यात येत आहेत. याशिवाय दहाही झोनस्तरावर नागरिकांना जनजागृती पत्रक वितरीत करुन त्यांना उष्माघातबाबत जागरुक केले जात आहे, अशी माहिती देखील मनपाचे वैद्यकीय आरोग्य अधिकारी डॉ. दीपक सेलोकर यांनी दिली आहे.

### नागपूर महानगरपालिकेची आरोग्य यंत्रणा सज्ज




### उष्माघाताची लक्षणे

शरीराचे तापमान वाढल्यास त्याला उष्माघात म्हणतात. मळमळ, उलटी, ताप, त्वचा कोरडी पडणे, थकवा, चक्कर, डोकेदुखी, मनाची स्थिती बिघडते, चिडचिड, जीभ जड होणे, जास्त घाम येणे, पायात गोळे येणे, पोटऱ्यात वेदना, रक्तदाब वाढणे, मानसिक बेचैनी, बेशुद्धावस्था.

### उष्माघात टाळण्यासाठी अशी काळजी घ्या

१) नागरिकांनी कामाशिवाय उन्हात निघणे टाळावे.
२) उन्हात जाण्याची वेळ आल्यास योग्य खबरदारी घेतली जावी.
३) उन्हाच्या वेळेत बाहेर फिरणे टाळावे, भरपूर पाणी प्यावे.
४) स्वत:सह इतरांच्याही तब्येतीची काळजी घ्यावी हलकी, पातळ व सच्छिद्र कपडे वापरावीत बाहेर जाताना गॉगल्स, छत्री किंवा हॅट, बूट किंवा चप्पलचा वापर करावा, प्रवासादरम्यान पाण्याची बाटली सोबत ठेवावी, उन्हात काम करताना हॅट किंवा छत्रीचा वापर करावा.
५) ओल्या कपड्याने डोके, मान, चेहरा झाकणे, शरीरात पाण्याचे प्रमाण कमी होत असल्यास ओआरएस, लिंबूपाणी, ताक आदी पेय नियमीत पिणे, घर थंड ठेवण्यासाठी ओलसर पडदे, पंखा, कुलर आदींचा वापर करावा.

### हे करणे टाळा

१) उष्माघात टाळण्यासाठी उन्हाच्या वेळेत घराबाहेर जाणे, उन्हात कष्टाची कामे करणे टाळा.
२) लहान मुले किंवा पाळीव प्राण्यांना बंद असलेल्या व पार्क केलेल्या वाहनात ठेवू नका.
३) गडद, घट्ट व जाड कपडे परिधान करणे टाळावे, उन्हात स्वयंपाक करणे टाळावे, स्वयंपाक करताना स्वयंपाक घराची दारे व खिडक्या उघडी ठेवावीत.
४) मद्य, चहा, कॉफी, सॉफ्टड्रिंक्स ही पेय टाळावी, शिळे आणि उच्च प्रथिने असलेले अन्न खाणे टाळावे.

## स्नेहनगर येथील भूजल पुनर्भरण प्रणालीच्या कामाची आयुक्तांनी पाहणी केली

■ महासागर प्रतिनिधी
नागपूर,दि. ०९ एप्रिल :
नागपूर शहरातील सिमेंट रस्त्यांच्या प्रकल्पात पावसाचे पाणी संकलित करण्यासाठी एक प्रणाली विकसित केली जाणार आहे, ज्याच्या माध्यमातून भूजल पुनर्भरण होईल. स्नेहनगर, खामला येथील या कामाची पाहणी बुधवारी (ता. ९) नागपूर महानगरपालिका आयुक्त आणि प्रशासक डॉ. अभिजीत चौधरी यांनी केली.



नागपूर महानगरपालिकेने सिमेंट रस्ते टप्पा ४ अंतर्गत बांधण्यात येणाऱ्या रस्त्यांमध्ये पावसाचे पाणी संकलित करून भूजल पातळी वाढविण्याचा निर्णय घेतला आहे. याचा उद्देश पायाभूत सुविधांच्या विकासाला चालना देणे आणि जल पुनर्भरण तसेच पूर नियंत्रण साधणे आहे.

मनपा आयुक्तांनी गुलमोहर सभागृहांच्या मागे आणि जॉगर्स पार्कजवळ असलेल्या सिमेंट रस्त्याच्या कामात पाणी संकलन आणि जल पुनर्भरणाच्या प्रणालीची पाहणी केली. यावेळी मुख्य अभियंता श्रीमती लीना उपाध्ये, अधीक्षक अभियंता श्री मनोज तालेवार, कार्यकारी अभियंता श्री रवींद्र बुंधाडे उपस्थित होते. कंत्राटदार राजेश दयारामानी यांच्याकडून रस्त्याचे काम सुरू आहे.

पावसाचे पाणी संकलित करण्यासाठी आणि भूजल पुनर्भरणासाठी रस्त्याच्या बाजूला २० मीटर खोल खड्डा खोदण्यात आलेला आहे. या खड्ड्यात पावसाचे पाणी शोषित होऊन भूजल पातळी वाढवेल. हा खड्डा पावसाळी नालीसह जोडण्यात आलेला आहे, ज्यामुळे पावसाचे पाणी त्या नाल्याद्वारे खड्ड्यात जाईल आणि भूगर्भातील पाणी पातळी वाढवेल.

सिमेंट रस्ते टप्पा ४ मध्ये २३.४५ किलोमीटर लांबीचे ३३ रस्ते तयार होणार आहेत, आणि यामध्ये १४७ जल पुनर्भरण आणि पाणी संकलन खड्डे तयार केले जातील. श्री. तालेवार यांनी मा. आयुक्त यांना भूजल पूनर्भरण प्रणाली कशा प्रकारे तयार केली यांची माहिती दिली व मुख्य अभियंता यांनी सांगितले की, एक महिना या प्रणालीचे निरीक्षण करून त्यावर निर्णय घेतला जाईल. या खड्ड्यावर लोखंडाची जाळी टाकण्यात आलेली आहे, आणि वरचा कचरा स्वच्छ करण्यासाठी सुविधाही पुरविण्यात येईल. कंत्राटदाराला १० वर्षे या रस्त्यांचे आणि पाणी संकलन प्रणालीचे देखरेख करण्याची जबाबदारी दिली गेली आहे.

आयुक्तांनी या जल पुनर्भरण प्रणालीचे कौतुक केले आणि काही महत्त्वाचे निर्देशही दिले. यावेळी उपअभियंता श्री शशांक ताटेवार, कनिष्ठ अभियंता श्री पुरषोत्तम पांडे, आणि व्यवस्थापन सल्लागार श्री निलेश उगेमुगे उपस्थित होते.

## क्राईम कॉर्नर

### बांधकामस्थळावरून लाखाचा माल चोरी

**नागपूर,दि. ०९ एप्रिल :** हुडकेश्वर ठाण्यांतर्गत चोरांनी बांधकाम स्थळावरून एक लाख रुपयांचा माल चोरून नेला. या प्रकरणी पोलिसांनी राजकुमार सुरेश मस्के (४१) रा. खापरीच्या तक्रारीवरून गुन्हा नोंदविला आहे.

विहीरगावच्या जय मां दुर्गा सोसायटीत राजकुमार यांच्या नवीन घराचे बांधकाम सुरू आहे. बांधकामस्थळीच एका खोलीमध्ये बांधकामासाठी आवश्यक सर्व सामान ठेवण्यात आले होते. मध्यरात्रीला अज्ञात आरोपीने खोलीचे कुलूप तोडून ईलेक्ट्रिक आणि टाईल्स फिटिंगचे सामान चोरून नेले. चोरीबाबत समजताच राजकुमार यांनी पोलिसात तक्रार केली. पोलिसांनी अज्ञात आरोपीवर गुन्हा नोंदवून तपास सुरू केला आहे.

### कारचालकासह कंत्राटदारावर गुन्हा

**अपघातानंतर मजुराला रस्त्यावर फेकल्याचे प्रकरण**

**नागपूर,दि. ०९ एप्रिल :** अपघातानंतर जखमी मजुराला उपचारार्थ रुग्णालयात दाखल करण्याचे सोडून रस्त्यावर फेकणारा कारचालक आणि मजुराच्या कंत्राटदाराविरुद्ध हिंगणा पोलिसांनी विविध कलमान्वये गुन्हा नोंदविला आहे. कृष्णा तुलसीदास भुरसे (४५) रा. उदयनगर, असे मृताचे नाव आहे.

कृष्णा घराजवळच राहणारा कंत्राटदार रुपेश शालिकराम वाकले (३२) याच्याकडे काम करीत होता. गत ३० मार्चच्या रात्री कामावरून घरी जात असताना रुपेशने गुमगाव परिसरात निष्काळजीपणे वाहन चालवून अचानक ब्रेक दाबला. त्यामुळे कृष्णा दुचाकीवरून उसळत रस्त्यावर जाऊन पडला. सावरण्यापूर्वीच भरधाव आलेल्या पांढऱ्या रंगाच्या कारच्या चालकाने त्याला चिरडले. अपघातानंतर कार चालकाने वाहन थांबविले. मदतीचा विश्वास देऊन कृष्णाला रुग्णालयात नेण्याच्या बहाण्याने कारमध्ये बसवले. मात्र रुग्णालयात पोहोचविण्याऐवजी जुना चिंचभवन पुलाजवळील सर्व्हीस रोडवर जखमी अवस्थेत सोडून पसार झाला. हिंगणा पोलिसांनी अकस्मात मृत्यूची नोंद करून तपास सुरू केला होता. तपासादरम्यान रुपेश आणि कार चालकाने निष्काळजीपणे वाहन चालविल्याचे निष्पन्न झाले. पोलिसांनी कार चालकाविरुद्ध पुरावा नष्ट करण्याचा गुन्हाही नोंदविला आहे. सीसीटीव्ही कॅमेऱ्यांच्या फुटेजच्या माध्यमातून त्याचा शोध सुरू आहे.

### बनावट तेलाची विक्री करणाऱ्यावर धाड

**१.१८ लाखाचा माल जप्त**

**नागपूर,दि. ०९ एप्रिल :** नामांकित कंपन्यांच्या नावाचा गैरवापर करत बनावट खाद्यतेल विकणाऱ्या व्यापाऱ्यावर गुन्हे शाखा युनिट ४च्या पथकाने धाड टाकली. मोठ्या प्रमाणात बनावट तेलाचे डबे जप्त करून संबंधित व्यापाऱ्याला ताब्यात घेतले आहे. वासुदेव तुलाराम खंडवानी (६५) रा. रामदेव अपार्टमेंट, लकडगंज असे आरोपी व्यापाऱ्याचे नाव आहे.

मंगळवारी सायंकाळी ६ वाजताच्या सुमारास युनिट ४चे पथक लकडगंज पोलिस ठाण्यांतर्गत गस्त घालत होते. या दरम्यान मोखारे मोहल्लयात एका व्यापाऱ्याचे गोदाम आहे. त्या व्यापाऱ्याने मोठ्या प्रमाणात नामांकित कंपन्यांच्या नावावर बनावट खाद्य तेलाचा साठा केला असून त्याची बाजारात विक्री करीत असल्याची माहिती मिळाली. या माहितीच्या आधारावर पोलिसांनी गोदामावर धाड टाकली. यावेळी खंडवानी किंग्स सोयाबीन ऑईल, फॉर्च्यून सनलाईट रिफाइंड सोयाबीन ऑईल आणि सोया हेल्थ रिफाइंड ऑईलचे लोगो असलेले लेबल तेलाच्या डब्यांवर चिकटवताना दिसला. नामांकित कंपन्यांच्या नावावर तो बनावट मालाची अधिक किंमतीमध्ये बाजारात विक्री करीत होता.

पोलिसांनी खंडवानीकडून मोठ्या प्रमाणात कंपन्यांचे लोगो असलेले स्टिकर जप्त केले. ४६ डब्यांमध्ये त्याने बनावट तेल भरलेले होते. पोलिसांनी त्याच्याकडून तेल, तेलाचे खाली डबे, पॅकिंग मशीन, वजन काटा आणि लेबल असा एकूण १ लाख १८ हजार रुपयांचा माल जप्त केला. त्याच्याविरुद्ध फसवणूक आणि कॉपीराईट अॅक्टसह विविध कलमान्वये गुन्हा नोंदवून पुढील कार्यवाहीसाठी लकडगंज पोलिसांच्या स्वाधिन केले. ही कारवाई युनिट ४ चे पोलिस निरीक्षक कमलाकर गड्डीमे आणि त्यांच्या पथकाने केली.

### ४,६९९ वाहन चालकांवर कारवाई

**नागपूर,दि. ०९ एप्रिल :** वाहतूक शाखा पोलिसांनी मोटार वाहन कायद्यान्वये विविध कलमांखाली एकूण ४,६९९ वाहन चालकांवर कारवाई करून ४,४४,३०० रुपयांचा दंड वसूल केला. त्याचप्रमाणे शहर पोलिसांनी महाराष्ट्र दारूबंदी कायद्यान्वये ४ व एनडीपीएस अन्वये २ अशा ६ प्रकरणात ६ आरोपींवर कारवाई करून २,४२,०७० रुपयांचा माल जप्त केला. तसेच महाराष्ट्र जुगार बंदी कायद्यान्वये २ प्रकरणात ३ जुगाऱ्यांवर कारवाई करून ११,००० रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला. वरील सर्व मोहीम एकत्रितरित्या नागपूर शहर पोलिसांतर्फे राबविण्यात आली. या पुढेही कारवाई प्रभावीपणे राबविण्यात येणार असून वाहनचालकांनी वाहन चालविताना वाहनासंबंधी सर्व कागदपत्रे जवळ बाळगावित असे आवाहन वाहतूक शाखेतर्फे नागरिकांना करण्यात आले आहे.

## दुचाकी वाहनांसाठी सर्विस लेन तयार करण्यासाठी गडकरींना निवेदनाद्वारे मागणी

■ महासागर प्रतिनिधी
नागपूर,दि. ०९ एप्रिल :
सामाजिक कार्यकर्ते इबादुल सिद्दीकी उर्फ जनहितशी यांनी नागपुरात केंद्रीय रस्ते वाहतूकमंत्री नितीनजी गडकरी यांची भेट घेऊन त्यांच्याशी चर्चा करून देशभरात होणाऱ्या अपघातात लाखो लोकांचे प्राण वाचवण्यासाठी राष्ट्रीय व राज्य महामार्गावर दुचाकी वाहनांसाठी सर्विस रस्ते वाढविण्याची मागणी केली. विशिष्ट लेन तयार करण्यासाठी सिद्दीकी यांनी गडकरींना नम्र विनंती केली की, भारतभर रस्ते वाहतुकीमध्ये चारचाकी वाहने आणि मोठे ट्रक, लॉरी आणि मोठे मोठे ट्रक चालत असल्याने दुचाकी वाहनांच्या अपघातांचे प्रमाण सर्वाधिक आहे. त्यामुळे कुटुंबासह प्रवास करणाऱ्या दुचाकी चालकांसह संपूर्ण कुटुंबच अपघाताचे बळी पडतात. दरवर्षी अपघातात दीड लाखांहून अधिक मृत्यू होत असून पाच लाखाहुन अधीक मोठे अपघात होतात. दहा लाखाहुन अधीक लहान दुर्घटना होते. यामध्ये १९ ते ३५ वयोगटातील नवयुवक युवतींचा ६५ टक्के दुचाकी स्वारांचा मृत्यू झाला आहे. त्यामुळे अशा अपघातांना आळा घालण्यासाठी राष्ट्रीय आणि राज्य महामार्गांच्या सर्विस रस्त्यांचे विस्तारीकरण करणे आणि रस्त्यालगत दुचाकी वाहनांसाठी खास लेन स्वतंत्र लेन तयार करणे आवश्यक झाले आहे. त्यामुळे दुचाकीस्वारांना स्वतंत्रपणे वाहन चालवितांना फायदा होणार आहे. तसेच महामार्गावर अपघात होण्याची शक्यता कमी आहे. लाखो लोकांचे प्राण वाचविणे महत्त्वाचे आहे. सिद्दीकी यांनी गडकरींना सांगितले की, त्यांच्या नेतृत्वाखाली देशात महामार्गांचा उल्लेखनीय विकास झाला आहे.



## लाईफ्स जर्नी पुस्तकाचे प.पू.स्वामी अवधेशानंद गिरी महाराजांच्या हस्ते प्रकाशन

■ महासागर प्रतिनिधी
नागपूर,दि. ०९ एप्रिल :
नागपूरात नुकत्याच पार पडलेल्या श्री शक्ती चंडी महायज्ञ या पवित्र आणि अध्यात्मिक वातावरणात ४ मार्च रोजी लाईफ्स जर्नी: अ गाईड टू इफेक्टिव्ह पॅरेंटिंग अॅन्ड हेल्दी रिलेशनशिप्स या पुस्तकाचे प्रकाशन प.पूज्य स्वामी अवधेशानंद गिरी महाराजांच्या पवित्र शुभहस्ते करण्यात आले.

याप्रसंगी पुस्तकाचे लेखक विकास गुप्ता आणि महाराष्ट्र जलसंपदा नियामक प्राधिकरणाच्या आर्थिक समिती सदस्य सौ. श्वेताली ठाकरे प्रामुख्याने उपस्थित होत्या. भारतीय संस्कृतीच्या मूल्यांवर आधारित आणि भावनिक तसेच वैचारिक सखोलतेने लिहिलेले हे पुस्तक केवळ मार्गदर्शक नव्हे, तर एक परिवर्तनशील अनुभव आहे. प्रकृतीच्या सान्निध्यातील शिक्षण, अनुभवाधिष्ठित क्रिया, आणि सक्रिय पालन पोषणाच्या पद्धती यावर आधारित हे पुस्तक सुदृढ नातेसंबंध निर्माण करण्यास मदत करते. पुस्तकांच्या स्तुती करतांना स्वामी अवधेशानंद गिरी महाराज म्हणाले, आई-वडिलांचे महत्त्व, योग्य पालकत्व आणि वैयक्तिक व व्यावसायिक आयुष्यात समतोल राखण्याचे हे पुस्तक अत्यंत प्रभावी संदेश देते. हे एक सामान्य पुस्तक नसून, आयुष्यातील प्रत्येक टप्प्यावर नातेसंबंध सुधारण्यासाठी वापरले जाऊ शकते. मी स्वतः हे पुस्तक वाचणार असून, सर्वांनीही वाचावे अशी माझी शिफारस आहे. पुस्तकाचे लेखक विकास गुप्ता यांनी पुस्तकाबद्दल बोलताना सांगितले की, हे लिखाण माझ्या वैयक्तिक अनुभवांमधून, संघर्षांमधून आणि शिकवणीतून जन्माला आले आहे. माझा हेतू असा आहे की प्रत्येक व्यक्ती आणि कुटुंबाला हे पुस्तक एक सोपा, पण प्रभावी मार्गदर्शक ठरावा, जो आपल्याला नात्यांचे खरे सौंदर्य पुन्हा अनुभवायला लावतो -

तेही निसर्ग आणि आपल्या सांस्कृतिक भावनांच्या मार्गदर्शनात या पुस्तकात छोट्या गोष्टी, निसर्गावर आधारित क्रिया, आणि अनुभवाधिष्ठित व व्यावहारिक दृष्टिकोन यांचा समावेश आहे. डिजिटल व्यत्यय, सहकाऱ्यांचा दबाव, भावनिक ताणतणाव आणि मूल्यांची गळती यांसारख्या आधुनिक समस्यांना हे पुस्तक प्रभावीपणे हाताळते. प्रकाशन सोहळ्याला अध्यात्मिक साधक, शिक्षक, पालक आणि युवक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

### लेखक विकास गुप्ता यांच्या पुस्तकाचे विमोचन



## हाय रीच पँटोग्राफ (एचआरपीटी) चाचणी यंत्रणा अजनी येथे सुरू

■ महासागर प्रतिनिधी
नागपूर,दि. ०९ एप्रिल :
नागपूर विभाग, मध्य रेल्वेने अजनी इलेक्ट्रिक लोको शेड येथे हाय रीच पँटोग्राफ (एचआरपीटी) चाचणी यंत्रणेची यशस्वीपणे स्थापना केली आहे. ही चाचणी व्यवस्था इलेक्ट्रिक इंजिनांच्या देखभाल कार्यक्षमता आणि कार्यसुरक्षेत लक्षणीय वाढ करणारा एक महत्त्वपूर्ण टप्पा आहे. ही स्वदेशी चाचणी यंत्रणा स्थानिक स्तरावर विकसित करण्यात आली असून सध्या अजनी येथे कार्यरत असलेल्या ४७ इलेक्ट्रिक इंजिनांमध्ये वापरल्या जाणाऱ्या एचआरपीटी ची सर्वसमावेशक चाचणी करण्यास सक्षम आहे.

नवीन चाचणी बेंच एचआरपीटी चे कार्य आणि कार्यक्षमतेची संपूर्ण तपासणी करण्यासाठी उपयुक्त आहे. यामध्ये प्रेशर सेटिंग्ज, कोणत्याही अडचणींचे निदान, तसेच उचलण्याची व खाली येण्याची वेळ, जास्तीत जास्त उंची, आडवी लवचिकता यांसारख्या मुख्य कार्यक्षमतेच्या मोजमापांसाठी प्रगत डिजिटल मीटरचा वापर केला जातो.



हाय रीच पँटोग्राफ उच्च केटेनेरी स्तर असलेल्या मार्गांवर विद्युत संपर्क सुनिश्चित करण्यासाठी महत्त्वाची भूमिका बजावतो. त्याची अचूक कार्यप्रणाली सुरक्षित व कार्यक्षम रेल्वे संचालनासाठी अत्यावश्यक आहे. ही चाचणी सुविधा बाह्य एजन्सींवरील अवलंबित्व समाप्त करते आणि अंतर्गत तांत्रिक क्षमतेत वाढ करते, ज्यामुळे देखभाल वेळेत व खर्चात लक्षणीय बचत होते.

ही उपक्रम नवोपक्रम, आत्मनिर्भरता आणि इंजिन देखभाल क्षेत्रातील उत्कृष्टतेच्या दृष्टीने नागपूर विभागाची कटिबद्धता दर्शविते. अशा प्रकारच्या तांत्रिक सुविधांच्या उन्नतीमुळे मध्य रेल्वे आपल्या संपूर्ण कार्यप्रणालीमध्ये विश्वासार्हता, कार्यक्षमता आणि प्रवासी सुरक्षा सुनिश्चित करत आहे.

## नेहा गोडघाटे यांच्या 'कारवान-ए-इश्क' संग्रहाचे १३ एप्रिल ला प्रकाशन

■ महासागर प्रतिनिधी
नागपूर,दि. ०९ एप्रिल :
नागपूर येथील मुळ निवासी, मात्र आता मुंबई येथे स्थायीक झालेली सुप्रसिध्द लेखिका, कवयत्री नेहा गोडघाटे यांचे नवीन कविता आणि गझल संग्रह 'कारवान-ए-इश्क'चे प्रकाशन १३ एप्रिल रोजी, डॉ. सागर खादीवाला, प्रा. जावेद पाशा, लोकनाथ यशवंत यांच्या शुभहस्ते अर्पण सभागृह हिंदी मोर भवन सिताबर्डी, नागपूर येथे सायंकाळी ५.३० वाजता. होणार आहे.



यापूर्वी नेहा गोडघाटे यांचे 'परवाज़' हा काव्य संग्रह प्रसिध्द सिने गितकार जावेद अख्तर यांचे हस्ते मुंबई येथे प्रकाशित करण्यात आलेले होते. नेहा गोडघाटे ही शासकीय तंत्र शिक्षण शाळा, नागपूर येथे नवव्या वर्गात शिकत असताना त्यांचा पहिला मराठी काव्यसंग्रह 'इंडिया इज माय कंट्री' हे डॉ. यशवंत मनोहर यांचे हस्ते प्रकाशित झाले असून बाबुराव बागुल यांची प्रस्तावना त्यात आहे.

आता प्रकाशित होत असलेले 'कारवान-ए-इश्क' त्यांचा तीसरा काव्य संग्रह आहे. यात काव्यात्मक रूपाने मानवीय संवेदना, सामाजिक वास्तव, महिलांचे वास्तव आणि भारतीय म्हणून संवेदना व्यक्त झालेल्या आहेत. या काव्य संग्रहाला मुबई येथील प्रसिध्द संस्था 'स्टोरी मिरर' यांनी प्रकाशित केलेले आहे.

## शेतकरी संघटना स्थापन करणाऱ्या महानविभूतीचा सत्कार

■ महासागर प्रतिनिधी
नरखेड ,दि. ०९ एप्रिल :
नरखेड तालुका शेतकरी संघटनाच्या वतीने दि.९ एप्रिल रोज बुधवार रोजी सकाळी १२ वाजता महात्मा फुले सांस्कृतिक सभागृह स्वामी विवेकानंद चौक नरखेड येथे संपन्न झाला. या कार्यक्रमाचे अध्यक्ष नारायण बांदरे माजी उपाध्यक्ष मार्गदर्शक शेतकरी संघटना नागपूर, वामनराव चटप माजी आमदार महाराष्ट्र राज्य, स्वागताध्यक्ष श्री वसंतराव वैद्य अध्यक्ष शेतकरी संघटना नरखेड, यांच्या प्रमुख उपस्थितीत संपन्न झाला. या कार्यक्रमात मदन दाजीबाजी कामडे विदर्भ प्रमुख शेतकरी संघटना व भाऊरावजी नासरे माजी सभापती पं. स. नरखेड या महानविभूतीचा सत्कार या कार्यक्रमात करण्यात आला. ही एक अभिमानाची व गौरवास्पद महान क्रांतिच मनावी लागेल या दोन महाविभुतीनी शेतकरी संघटनेचा पाया रचला त्यांच्या या महान क्रांतीने आज शेतकरी संघटना पाहवयास व त्यांची कार्य दिसत आहे. त्यांच्या या महानिभूतीची दखल घेत त्यांचा आज शेतकरी संघटनेच्या वतीने सत्कार करण्यात आला. या कार्यक्रमाला प्रमुख उपस्थिती म्हणून सौ शैलेजाताई देशपांडे माजी अध्यक्ष महिला आघाडी, सतीश दाणी, अण्णाभाऊ केदार, मुकेश मासुरकर, श्रीमती रंजनाताई मामडे ,प्रकाशभाऊ चरडे माजी नगरसेवक न. प. नरखेड , हे उपस्थित होते.



### भजन कीर्तनाने नवरात्र व श्रीराम नवमी उत्साहात साजरी

■ महासागर प्रतिनिधी
कन्हान,दि. ०९ एप्रिल :
सियामानस भजन मंडळ कांद्री द्वारे विविध मंदिरात पुजा अर्चना करून दोन दिवसीय भजन कीर्तनाने नवरात्र व श्रीराम नवमी उत्साहात साजरी करण्यात आली . सियामानस भजन मंडळ कांद्री द्वारे नवरात्र महोत्सव आणि श्रीराम नवमी निमित्त दोन दिवसीय भजन कीर्तन कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते . दुर्गा मंदिर,कांद्री, राम मंदिर टेकाडी कॉलोनी, हनुमान मंदिर,कांद्री येथे पुजा अर्चना करून भजन कीर्तन कार्यक्रमाची सुरूवात करण्यात आली . महिलांनी विविध प्रकारचे भजन कीर्तन करुन भक्तांचे मन मोहित केले . आरती करुन आणि प्रसाद वाटप करुन कार्यक्रमाची सांगता करण्यात आली .

### वाडीच्या महीला भजन मंडळानी स्पर्धेत मारली बाजी

■ महासागर प्रतिनिधी
वाडी,दि. ०९ एप्रिल :
कळमेश्वर येथील श्रीसंत लहानुजी महाराज मंदिरात परमहंस श्री संत लहानुजी महाराज मंदिर कमिटी व श्री गुरुदेव सेवा मंडळाच्या संयुक्त वतीने आयोजित भव्य महिला भजन स्पर्धेत ३८ महिला भजन मंडळांपैकी वाडीतील कोहळे ले-आऊटमधील साई महीला भजन मंडळानी सहाव्या क्रमांकाचे पारितोषीक प्राप्त केले. स्पर्धेवेळी संवादीनीवर सज्जनराव कन्हेरकर , मृदंगवादक अरुण कराळे, टाळकरी व गायन मंगला कडू, अरूणा देशमुख, संध्या वाघमारे, शालू देवरे, मंगला भोंडे, वंदना गोरे, ज्योती खोब्रागडे, ज्योत्सना सगणे , रेणूका शेळके, गीता थोटे आदींनी साथसंगत केली.आमच्या भजन मंडळानी स्पर्धेत प्रथमच भाग घेतला असुन स्पर्धेत झालेल्या चुका दुरस्त करुन प्रथम क्रमाकांचे बक्षीस मिळविण्यासाठी प्रयत्न करणार असल्याचे मंगला कडू यांनी सांगीतले.स्पर्धेचे परीक्षण बंडू कावळे यांनी केले.संचालन सचिन काळे यांनी तर आभार साहेबराव गोहने यांनी मानले.